महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुलजवळ, मुंबई आग्रा रोड,
नाशिक– ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com

क्र.नाविमं/संकीर्ण माध्य.व उमा/
नाशिक–४२२००३
दिनांक:– १०/१२/२०२०

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

**विषय :– माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्रोफाईल भरणेबाबत.**
**संदर्भ :– १.रा.मं.चे पत्र क.रा.मं./परीक्षा–८/३४०४ दिनांक ०५/०८/२०२०**
**२.रा.मं.चे पत्र क.रा.मं./परीक्षा–८/५०९२ दिनांक ०७/१२/२०२०**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील मंडळ मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांना कळविण्यात येते की, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून वेळोवेळी अद्ययावत माहिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रोफाईल भरण्याबाबत दिनांक १० ऑगस्ट २०२० ते १५ सप्टेंबर २०२० या कालावधीत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि, काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची प्रोफाईल भरण्याबाबतची प्रक्रीया अद्यापही अपूर्ण आहे.

फेब्रुवारी/मार्च २०२१ मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची आवेदनपत्रे भरून घेण्याच्या कार्यवाहीपूर्वी शाळांकडून प्रथम प्रोफाईल भरून घेतल्यानंतर शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयानां एक युनिक नंबर देण्यात येणार आहे. सदर नंबरच्या आधारे परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी लॉगिन करता येईल अन्यथा आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.

शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती प्रोफाईलमध्ये भरण्याची लिंक सद्यस्थितीत बंद आहे. त्यामुळे अशा **शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना प्रोफाईल भरण्यासाठी अथवा भरलेली माहिती दुरूस्त करण्यासाठी पुनश्च दिनांक १४ डिसेंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंत मुदत देण्यात येत आहे.**

सदर कालावधीत ज्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रोफाईल अपूर्ण आहे, अथवा ज्यांना भरलेली माहिती आवश्यकता असल्यास दुरूस्ती करावयाची आहे त्यांनी करावी. तसेच **सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रोफाईल संपूर्ण भरलेले आहे, त्यांनी हार्ड कॉपी मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे स्वाक्षरीने प्रमाणित करून मंडळ कार्यालयाकडे दिनांक ०२ जानेवारी २०२१ पर्यत पाठविण्यात यावी.**

तरी सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करावा अन्यथा आपणांस माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत. जर एखाद्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने अपूर्ण प्रोफाईल किंवा प्रोफाईल न भरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेचे /कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी.
प्रोफाईल भरण्यासाठी खालीलप्रमाणे वेबसाईट आहेत.

१.एसएससी साठी–profile.mh-ssc.ac.in
२.एचएससी साठी– profile.mh-hsc.ac.in

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ नाशिक ४२२ ००३.

**प्रत माहितीस्तव –**
मा.सचिव,राज्य मंडळ,पुणे

**टीप– नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे–महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक– ४२२ ००३.**

Scanned with CamScanner